ला.प्र.वि.हिंगोली,जि.हिंगोली
दिनांक :- 27.10.2023

# प्रेसनोट

**आलोसे सुर्यकांत शंकरराव खाडे वय 50 वर्षे, पद – ग्रामसेवक वर्ग -3, ग्रामपंचायत कार्यालय, पुर ता.औंढा नागनाथ जि.हिंगोली रा.वैष्णवी नगर, कारवाडी हिंगोली ता.जि.हिंगोली ह.मु.मगनपुरा, राजेश तोष्णीवाल यांचे राहते घर,एम.एफ.होंडा शोरूमच्या पाठीमागे, नांदेड जि.नांदेड यांना 1,05,000/- रू.ची लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल झाले बाबत.**

---

पिडीत तक्रारदार यांनी जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत मौजे पुर ता.औंढा नागनाथ जि.हिंगोली येथील गावाअंतर्गत नळ योजनेचे काम पुर्ण करून पुढील देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामपंचायत पुर ता.औंढा नागनाथ यांना हस्तांतरण करून, हस्तांतरण प्रमाणपत्र देण्यासाठी व नविन नळ पाणी पुरवठा योजना अंतर्गत वयक्तीक घरगुती नळ जोडणी करण्याचे कामाचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी ग्रामपंचायत पुर ता.औंढा नागनाथ येथील ग्रामसेवक सुर्यकांत शंकरराव खाडे हे तक्रारदार यांना 1,15,000/- रू.लाचेची मागणी करीत असल्याबाबत दि.26/10/2023 रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली येथे येवुन लेखी तक्रार दिली त्यावरून यातील तक्रारदार यांना पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे यांनी हस्तांतरण प्रमाणपत्र देण्यासाठी व नविन नळ पाणी पुरवठा योजना अंतर्गत वयक्तीक घरगुती नळ जोडणी करण्याचे कामाचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी पंचासमक्ष 1,15,000/- रू.लाचेची मागणी करून तडजोडीअंती 1,05,000/- रू.स्विकारण्याची सहमती दर्शवुन सापळा कार्यवाही दरम्यान सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असुन दि.26/10/2023 रोजी 17:22 वाजता आलोसे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन कुरूंदा जि.हिंगोली. येथे गु.र.न.385/2023 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी श्री. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परीक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक,श्री.प्रफुल्ल अंकुशकर पोलीस निरीक्षक, स.पो.उप.नि/युनुस शेख,विजय शुक्ला, पोहेकॉ/ज्ञानेश्वर पंचलींगे,रविंद्र वरणे, तानाजी मुंढे, भगवान मंडलीक, गजानन पवार, गोविंद शिंदे चापोह/ शेख अकबर, मपोना/ योगीता अवचार, पोशि/ राजाराम फुपाटे व पोशि/शिवाजी वाघ सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम (एजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर परीश्रमीका व्यतिरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास कृपया लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुपचपत प्रतिबंधक कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप **www.acbmaharashtra.net** हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.1064, दुरध्वनी क्र.02456-223055,**
**मोबाईल क्रमांक :- 9623999944,9870221379,8888578999**

Scanned with OKEN Scanner